# ग्रामीण स्वच्छ भारत अभियान

**डॉ. साईनाथ राधेशाम बनसोडे**
*सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभागप्रमुख*
*महिला कला महाविद्यालय, औरंगाबाद.*

***गोषवारा***

*भारतामध्ये सार्वत्रिक स्वच्छता मोहीमप्राप्त करण्याच्या प्रयत्नांना गती देण्यासाठी आणि सुरक्षित स्वच्छतेवर लक्षकेंद्रित करण्यासाठी भारताच्या पंतप्रधानांनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी स्वच्छ भारत मिशन सुरु केले. महात्मा गांधींना त्यांच्या १५० व्या जयंतीदिनी श्रद्धांजली म्हणून २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत स्वच्छ भारत साध्य करण्याचे सरकारचे उद्दिष्ट होते.यावेळी उघड्यावरशौच करण्याची प्रथा पूर्णपणे बंद करण्यात आली. ग्रामीण भारतात लोकचळवळींद्वारे हागणदारीमुक्त गावाची स्थिती टिकून राहावी तसेच घन कचरा व स्वच्छतेचं योग्य व्यवस्थानव्हावं यासाठी करण्यात आली.*

***शोध संज्ञा :***
*स्वच्छ, मिशन, ग्रामीण, सुधारणा.*

**प्रस्तावना:**

स्वच्छ परिसर, पिण्यायोग्य पाणी आणि कचऱ्याची योग्य पद्धतीने केलेली विल्हेवाट या सर्व घटकांवर मानवाचे आरोग्य अवलंबून असते. गढूळ पाणी, अस्वच्छ परिसर तसेच अयोग्य पद्धतीने केलेली मलमूत्राची विल्हेवाट यामुळे रोगराई झपाट्याने वाढत आहे. यामुळे विकसनशील देशाची वाढ खुंटते.लोकसंख्येच्या गणतीत भारताचा दुसरा क्रमांक लागतो.जेवढी जास्त लोकसंख्या तेवढी स्वच्छतेची अधिक गरज! ही बाब लक्षात घेता सरकारने १९८६ साली केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाची अंमलबजावणी केली. ग्रामीण भागासाठी विशेषतः केंद्र सरकारच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेचा एक भाग म्हणून पहिला स्वच्छता कार्यक्रम १९५४ मध्ये सुरु करण्यात आला. दरम्यान ग्रामीण भागात स्वच्छतेचे महत्व पटवून देण्याची गरज असल्याचे सरकारच्या लक्षात आले. ग्रामीण लोकांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारणे आणि महिलांना सन्मान मिळवून देण्याच्या प्राथमिक उद्देशाने केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाची अंमलबजावणी १९८६ साली करण्यात आली. यामध्ये वैयक्तिक स्वच्छता, सांडपाण्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे, घनकचऱ्याचे व्यवस्थापन, पिण्यायोग्य शुद्ध पाणी अशा गोष्टींचा समावेश करण्यात आला.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

ग्रामीण स्वच्छ भारत अभियान चे मुख्य उद्देश हे गावांचा हागणदारीमुक्त दर्जा टिकवून ठेवणे आणि घन व द्रव कचरा व्यवस्थापन उपक्रमांद्वारे ग्रामीण भागात स्वच्छतेचे स्तर सुधारणे हा होय.

**संशोधन पद्धती:**

'ग्रामीण स्वच्छ भारत अभियान' या विषयाचे अध्ययन करण्यासाठी समाजशास्त्रीय अध्ययन पद्धतीचा प्रयोग करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधन लेखनामध्ये दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला असून यामध्ये प्रकाशित लिखान, मासिके, संदर्भ ग्रंथ, इंटरनेट, विविध अहवाल,वृत्तपत्र, इत्यादी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

**१. माहिती शिक्षण, सवांद व क्षमता बांधणी उपक्रम :**

ग्रामीण स्वच्छ भारत अभियान हे केवळ शौचालय बांधण्यासाठीच नाही तर स्वच्छतेच्या चांगल्या पद्धती अंगीकारण्यासाठी तसेच जनतेच्या वर्तनात बदल घडविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. जनतेमध्ये स्वच्छते विषयी जनजागृती करणे महत्वाचे असल्याने माहिती, शिक्षण आणि संवाद (IEC) धोरणे, नियोजन आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी हे स्वच्छ भारत मिशन करिता महत्वाचे घटक मानले जाते.

**२. वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम :**

वैयक्तिक शौचालय बांधकासाठी ग्रामपंचायत द्वारे आता साहाय्य केले जाणार आहे. सर्व ग्रामीण कुटुंबाना सुरक्षित शौचालये मिळतील याची खात्री करणे हे या मिशनचे उद्दिष्ट आहे. यासाठी नवनवीन आणि सुरक्षित

तंत्रज्ञानाची माहिती मिळवून योग्य शौचालय निवडणे आणि त्याची अंमलबजावणी करण्यात येते. खालील कुटुंबेयोजने अंतर्गत मिळणाऱ्या अनुदानाकरिता पात्र ठरतील.

- दारिद्ररेषेखालील सर्व कुटुंब

- अनुसूचित जाती जमातीतील कुटुंबे, कुटुंबातील एखादी व्यक्ती शारीरिकदृष्ट्या अपंग असलेली कुटुंबे, भूमीहीन शेतमजूर, लहान आणि अत्यल्प शेतकरी
- वैयक्तिक शौचालयासाठी १२,००० रुपये पर्यंत अनुदान दिले जाईल
- इतर कोणत्याही ग्रामीण गृहनिर्माण योजने अंतर्गत बांधलेल्या घरातील ज्या कुटुंबांकडे शौचालय नाही त्यांनी स्वच्छता सुविधा निर्माण केल्यास ते स्वच्छ भारत मिशन अंतर्गत मिळणा-या प्रोत्साहन अनुदानास पात्र राहतील.

**३. सार्वजनिक शौचालये :**

गाव ठिकाणी सार्वजनिक सार्वजनिक शौचालये बांधणे ग्रामीण स्वच्छ भारत अभियान अंतर्गत एक घटक आहे.यामध्ये पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र सुविधा असतील.तसेच योग्य संख्येने टॉयलेट सीट्स आंघोळीसाठी क्यूबिकल्स,कपडे धुण्याकरिता जागा,वॉश बेसिन इत्यादींचा समावेश असेल.

**4.घनकचरा व्यवस्थापन**:

घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत ग्रामीण जनजीवन सुधारण्यासाठी गांडूळ खत निर्मिती, बायोगॅस प्रकल्प, सार्वजनिक शोषखड्डे असे अनेक उपक्रम राबविता येतील.

व्यवसाय मॉडेल्सचा वापर/स्वयं-शाश्वत महसूल मॉडेल तयार करणे :

व्यावसायिकांने स्वयंशाश्वत महसूल मॉडेल तयार करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात फॅक्टरी मधील दूषित पाणी नदी नाल्यात सोडले जाते. यावर संबंधित राज्य सरकारने ग्रामीण भागातील लोकांमध्ये जनजागृती निर्माण करून खाजगी क्षेत्रातील व्यावसायिकांना घन कचऱ्याचे योग्य विघटन करण्याचे आवाहन करणे.ज्या

कुटुंबाना जागेच्या कमतरतेमुळे वैयक्तिक घरगुती शौचालये नाहीत अशा कुटुंबांसाठी सामान्यतः कम्युनिटी सॅनिटरी कॉम्प्लेक्स (CSC) म्हणून ओळखल्या जाणार्या सामुदायिक व्यवस्थापित स्वच्छता संकुलाची तरतूद केली जाऊ शकते.योग्य शाश्वत मॉडेलची अंमलबजावणीची यंत्रणा ठरविण्यासाठी राज्य सरकारने हवामान परिस्थिती नुसार अनुकूल तंत्रज्ञान वापरावे.

ग्रामीण भागात मलमूत्र व्यवस्थापन कसे असावे? ग्रामीण भागात मलमूत्राचे सुरक्षित व्यवस्थापन हा स्वच्छतेच्या घटकांपैकी एक भाग आहे. नवीन तंत्रज्ञानाबद्दल अपुरी माहिती, पारंपरिक वागणूक आणि आर्थिक अडचणी यामुळे उघड्यावर मल विसर्जन मोठया प्रमाणावर केलले जाते. उघड्यावर मलमूत्राचे विसर्जन केल्याने त्याचा परस्पर संबंध हा पिकांद्वारे अन्नासोबत होतो. त्यामुळे सुरक्षित स्वच्छता आणि पद्धतींचा अवलंब करून मलमूत्राचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. यासाठी योग्य डिझाईनचे शौचालय असणे महत्वाचे आहे. गावठीकाणी आदर्श शौचालय बांधण्यासाठीचे निकष खालील प्रमाणे आहेत.

- आर्थिकदृष्ट्या परवडणारे असावे
- कमीतकमी पाण्याचा योग्य वापर होईल याकडे लक्ष द्यावे
- कमी जागेत वापरण्यास सुलभ असे शौचालय बांधावे
- रोगराईपासून मुक्त असणे आवश्यक
- बांधकाम मजबूत असावे

वरील गोष्टींची पूर्तता करत आज गावपातळीवर शौचालयांचे बांधकाम करण्यासाठी विविध पर्याय उपलब्ध आहेत.

**सारांश:**

आपल्या गावात स्वछता राखली जावी तसेच गावाला हगणदारी मुक्त करावे हि जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे. ग्रामीण स्तरावर 'हगणदारी मुक्त' गाव करण्यासाठी सरकार सुद्धा प्रयत्नशील आहे. ग्रामीण स्वच्छ भारत अभियान या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन सरकार करीत असते.

**संदर्भ ग्रंथ:**

1. स्वच्छ भारत अभियान –डॉ.विमल कुमार लहारी
2. स्वच्छ भारत समृद्ध भारत-श्री.पंकज के.सिंग
3. स्वच्छ भारत सशक्त भारत-महेश शर्मा
4. इंटरनेट